24-01-2025-Dai-04_DH_PAN_20_08_2016-3.qxp 01/23/2025 11:17 PM Page 1



## निवडक

### सप्तेश्वर उच्च माध्यमिकचे आज बक्षीस वितरण

■ टीम दैनिक हेराल्ड

हरमल, दि. २३ : मांद्रे येथील सप्तेश्वर इन्स्टिट्युट फॉर हायर सेकंडरी ॲण्ड व्होकेशनल स्टडीजचे वार्षिक बक्षीस वितरण समारंभ उद्या शुक्रवार, दि. २४ जानेवारी रोजी सकाळी १०.३० वाजता हायस्कूल सभागृहात होणार आहे. या सोहळ्यास प्रमुख पाहुणे माजी प्राचार्य सुदन बर्वे, खास निमंत्रित पार्सेचे माजी सरपंच व निवृत्त शिक्षक देवेंद्र प्रभुदेसाई व खास निमंत्रित मांद्रेचे सरपंच मिगेल फर्नांडिस उपस्थित राहणार आहेत.तसेच प्रभारी प्राचार्य अरुण नाईक,संस्थेचे चेअरमन रमाकांत खलप,सचिव नारायण नाईक व पालक शिक्षक संघाचे अध्यक्ष महेश कांबळी उपस्थित राहणार आहेत. संस्थेच्या आजी माजी विद्यार्थी,पालक वर्गाने उपस्थित राहावे, असे आवाहन केले आहे.

---

### साखळी रवींद्र भवनात आज 'बर्फाग्नी'

■ टीम दैनिक हेराल्ड

साखळी, दि. २३ : सुर्ल साखळी येथील अभय थिएटरतर्फे उद्या शुक्रवार, दि.२४ जानेवारी रोजी रात्री ८ वा. रवींद्र भवन सांखळीच्या पं.मनोहरबुवा शिरगावकर नाट्यगृहात दोन अंकी मराठी नाटक 'बर्फाग्नी' सादर करण्यात येणार आहे. नाटकाचे मूळ लेखक सौरभ शुक्ल असून मराठी अनुवाद मिलिंद बर्वे यांनी केला आहे.नाटकाचे दिग्दर्शन अभय अनंत जोग यांचे आहे. सत्य–असत्य,खरं–खोटं,म्हणजे नेमकं काय? डोळ्यांनी पाहतो,कानांनी ऐकतो ते सत्य? की यापेक्षा काही वेगळं असतं? असू शकतं? सत्य हा शब्द सत् आणि तत् या दोन धातूं पासून बनलेला आहे. याचा अर्थ असा – 'हेही' आणि 'तेही'. म्हणजेच सत्य पूर्णपणे एकतर्फी नसते.आणि असं जर असेल तर मानवी व्यवहाराचं काय? अजून एक गंमत म्हणजे सत्य आणि असत्य या दोन्ही शब्दांत 'सत्य' आहेच.तर अशा या गूढ सत्याच्या चक्रव्यूहात अडकलेल्या तीन माणसांची शितल धगधगती कहाणी म्हणजे 'बर्फाग्नी' आहे. या नाटकात महेश तांबट (डॉ.कौल),मिलिंद बर्वे (गुलाम रसूल) व कु.अर्चना डिचोलकर (नफिसा) यांच्या भूमिका असून प्रकाश योजना पांडुरंग पांगम,पार्श्वसंगीत सागर गावस,रंगभूषा अजय फोंडेकर,वेशभूषा वेदांग बेहेरे,निर्मिती साहाय्य रघुनाथ च्यारी,श्रेयश गाडगीळ,आसावरी कुलकर्णी,नेपथ्य अभय अनंत जोग,सूत्रधार गुरुदास सामंत व निर्मितीप्रमुख शिवानंद खेडेकर आहेत.

---



पिर्ण : रस्ता हॉटमिक्स कामाचा शुभारंभ प्रसंगी उपस्थित मंत्री निळकंठ हळर्णकर व इतर.

### पिर्ण येथे रस्ता हॉटमिक्स कामाचा शुभारंभ

■ टीम दैनिक हेराल्ड

शिवोली, दि. २३ : थिवी मतदारसंघातील विविध ठिकाणी रस्ता हॉटमिक्स कामाचे लवकरच सुरुवात केली जाणार असून येणाऱ्या काळात या मतदारसंघात अनेक विकास कामे केली जाणार असल्याचे माहिती मच्छीमार मंत्री निळकंठ हळर्णकर यांनी दिली. पिर्ण येथील गणपती मंदिर ते अडवालपाल जंक्शनपर्यंत रस्त्याचे हॉटमिक्स पद्धतीने डांबरीकरण कामाचा शुभारंभ मंत्र्यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी मंत्र्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमप्रसंगी पिर्ण सरपंच संदीप तानावडे, पंचसदस्य

पेडणे : सादर केलेल्या प्रकल्पासोबत विजेत्या विद्यार्थी.




### गणित प्रकल्प स्पर्धेत वजरी हायस्कूल प्रथम

■ टीम दैनिक हेराल्ड

पेडणे, दि. २३ : विकास हायस्कूल वळपे व गोवा राज्य विज्ञान व तंत्रज्ञान मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या पेडणे तालुका गणित प्रकल्प स्पर्धेत सरकारी माध्यमिक विद्यालय वजरी यांनी प्रथम क्रमांक प्राप्त केला. नववीतील दोन विद्यार्थिनी अनुष्का साळगावकर व श्रावणी परबकर यांनी भूमिती उद्यान व शहर या संकल्पनेवर आधारित हा प्रकल्प तयार केला. हा प्रकल्प तयार करण्यास हायस्कूलच्या गणित शिक्षिका निष्ठा कोळंबकर यांचे विशेष मार्गदर्शन लाभले. तसेच लेखी प्रश्नमंजुषा स्पर्धेत संस्कार नाईक या विद्यार्थ्याला उत्तेजनार्थ बक्षीस प्राप्त झाले.हे उज्ज्वल यश संपादन केल्याबद्दल विद्यालयाच्या मुख्याध्यापिका ममता नाईक, पालक शिक्षक संघ शालेय व्यवस्थापन समिती ,शिक्षक, व विद्यार्थी यांनी विशेष अभिनंदन केले.

---

# टीम इंडियाकडून श्रीलंकेचा दारुण पराभव

## १९ वर्षांखालील टी-२० विश्वचषक सामन्यात ६० धावांनी विजय | सूपर सिक्ससाठी पात्र

**नवी दिल्ली, दि. २३ :** १९ वर्षाखालील टी–२० वर्ल्डकपमध्ये भारतीय संघाने श्रीलंकेच्या महिला संघाचा पराभव करत सलग तिसरा विजय नोंदवला आहे. या सामन्यात टीम इंडियाने श्रीलंकेविरुद्ध केवळ ११८ धावा केल्या होत्या, पण तरीही त्यांना सहज विजय मिळाला. भारताने श्रीलंकेचा संघ अवघ्या ५८ धावांवर रोखला आणि ६० धावांनी आणखी एक मोठा विजय नोंदवला.

टीम इंडियाकडून गोंगाडी त्रिशाने शानदार फलंदाजी केली. तिने ४९ धावा केल्या. टीम इंडिया अ गटात सलग तीन सामने जिंकून अव्वल स्थानावर राहिली आणि सुपर ६ लीग टप्प्यासाठी पात्र ठरली आहे.

भारताने दिलेल्या लक्ष्याचा पाठलाग करताना श्रीलंकेच्या १९ वर्षांखालील महिला संघाला फक्त ५८ धावा करता आल्या. सलामीवीर संजना ५ धावा करून बाद झाली. निसंसाला खातेही उघडू शकले नाही. कर्णधार मनुदी नानायक्कारा २ धावा करून बाद झाली. हिरुणी हंसिका देखील २ धावा करून बाद झाली. या काळात शबनमने भारतासाठी घातक गोलंदाजी केली. त्याने ४ षटकांत ९ धावा देत २ बळी घेतले. पारुनिका आणि जोशिता यांनीही प्रत्येकी २ विकेट घेतल्या. आयुषी शुक्लाने एक विकेट घेतली.

तत्पूर्वी, श्रीलंकेच्या संघाने नाणेफेक जिंकत प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. हा निर्णय श्रीलंकेच्या पथ्यावरही पडला. कारण गोंगाडी त्रिशा वगळता भारताच्या कोणत्याच फलंदाजाला मोठी खेळी करता आली नाही. फक्त गोंगाडी त्रिशाच्या ४९ धावांच्या खेळीवर भारताने या सामन्यात मजबूत आघाडी मिळवली. त्रिशाने ५ चौकार आणि एक षटकार लगावला. तिच्या या खेळीमुळे टीम इंडियाने ११८ धावांपर्यंत मजल मारली. त्रिशाशिवाय एकाही फलंदाजाला २० धावांपर्यंत मजल मारता आली नाही. सानिका चालकेला खातेही उघडता आले नाही. कर्णधार निक्की प्रसाद ११ धावा करून बाद झाली. त्याने २ चौकार मारले. मिथिला विनोदने १६ धावांचे योगदान दिले. तर जोशिथाने १४ धावा केल्या. श्रीलंकेकडून लिमांसा तिलकरत्ने आणि प्रमुदी मथासराने २–२ विकेट घेतले.

पहिल्या सामन्यात टीम इंडियाने वेस्ट इंडिजचा ९ गडी राखून पराभव केला होता. यानंतर मलेशियाचा संघ १० गडी राखून पराभूत झाला आणि आता श्रीलंकेवर ६० धावांनी मोठा विजय नोंदवला गेला आहे. गुणतालिकेत भारतीय संघ ३ सामन्यांत ६ गुणांसह उपांत्यपूर्व फेरीसाठी पात्र ठरला आहे.




---




# म्हापसा ड्रीम क्रशर्स विजयी सलामी

■ टीम दैनिक हेराल्ड

▶ आल्कॉन जीएसबी युनिटी कप २०२५ स्पर्धा : कॉमनवेल्थ डेव्हलपर्स मडगाव मेगा स्ट्रायकर्स विजयी

**मडगाव, दि. २३ :** गोवा जीएसबी स्पोर्ट्स अँड चॅरिटेबल ट्रस्ट यांनी आयोजित केलेल्या आल्कॉन जीएसबी युनिटी कप २०२५' टी–२० क्रिकेट स्पर्धेत म्हापसा ड्रीम क्रशर्स यूसीने प्रायॉरिटी टायटन्सचा ३६ धावांनी पराभव केला. म्हापसाने २० षटकांत ७ बाद १८० धावा केल्या. यानंतर त्यांनी प्रायॉरिटीचा डाव १८.२ षटकांत १४४ धावांत संपवला. २६ धावांत ३ गडी बाद केलेला व्यंकटेश वेर्लेकर सामनावीर पुरस्काराचा मानकरी ठरला. या स्पर्धेतील सामने मडगावच्या एमसीसी मैदानावर खेळवले जात आहेत.

विद्युतझोतात झालेल्या स्पर्धेच्या सलामीच्या लढतीत कॉमनवेल्थ डेव्हलपर्स मडगाव मेगा स्ट्रायकर्सने रायझिंग स्टार्स ऑफ अंत्रुज यूसीचा ५ गडी व ४५ चेंडू राखून पराभव केला. त्यांनी विजयासाठीचे ११२ धावांचे लक्ष्य १२.३ षटकांत गाठले. सामनावीर ठरलेल्या अनिमेश प्रभुगावकर याने मेगा स्ट्रायकर्सकडून भेदक मारा करताना ४ षटकांत केवळ १७ धावांत २ गडी बाद केले. विस्मय फळगावकर व दुर्गेश प्रभुगावकर यांनी मेगा स्ट्रायकर्सला ४१ धावांची सलामी देत विजयाचा भक्कम पाया रचला.

**संक्षिप्त धावफलक**

रायझिंग स्टार्स ऑफ अंत्रुज यूसी – २० षटकांत ९ बाद १११ (गौरीश शेणवी लोटलीकर २३, ईशान कामत १४, साईश प्रभुदेसाई १२, अनीश प्रभुदेसाई ८–२, अनिमेश प्रभुगावकर १७–२, आदित्य आंगले १९–२, सिद्धेश प्रभू अळवेणकर ३०–१) पराभूत वि. सीडी मडगाव मेगा स्ट्रायकर्स – १२.३ षटकांत ५ बाद ११५ (विस्मय फळगावकर ३५, दुर्गेश प्रभुगावकर ३०, आदित्य प्रभुगावकर १९, रुद्रेश कामत २५–२, नंदन आचार्य ९–१, प्रशील कामत १८–१) म्हापसा ड्रीम क्रशर्स यूसी – २० षटकांत ७ बाद १८० (साईश हेगडे ३७, कौशल चुरी ३५, राजाराम कुंडईकर नाबाद ३५, स्मित दळवी ३१, गौरीश प्रभुदेसाई २५–२, विक्रांत प्रभू २६–१, कपिल सिनाय बोरकर १७–१, श्रीधर केणी ३१–१) विजयी वि. प्रायॉरिटी टायटन्स – १८.२ षटकांत सर्वबाद १४४ (कपिल सिनाय बोरकर ३३, सचिन सरदेसाई २९, वेद महांबरे २२, व्यंकटेश वेर्लेकर २६–३, महेश चुरी २०–२, विपुल देशप्रभू २२–२, कौशल चुरी १२–१, राजाराम कुंडईकर १३–१)

---

# आयपीएलपूर्वी केकेआरचे वाढले टेन्शन; सर्वात महागड्या खेळाडूला झाली दुखापत



मुंबई, दि. २३ : यंदाच्या आयपीएल हंगामाची चाहत्यांना नक्कीच उत्सुकता लागली असेल. आयपीएलचा आगामी हंगाम (२१ मार्च) पासून सुरू होईल आणि फायनल सामना (२५ मे) रोजी खेळवला जाईल अशी घोषणा आधीच करण्यात आली आहे. पण त्याआधीच कोलकाता नाईट रायडर्सला (केकेआर) मोठा धक्का बसला आहे. कोलकाताचा सर्वात महागडा खेळाडू, व्यंकटेश अय्यरला, रणजी ट्रॉफी सामन्यादरम्यान दुखापत झाली आहे. अय्यर हा स्थानिक क्रिकेटमध्ये मध्य प्रदेशकडून खेळतो आणि केरळविरुद्धच्या सामन्यात त्याच्या घोट्याला दुखापत झाली.

केरळविरूद्धच्या सामन्यात मध्य प्रदेश संघ प्रथम फलंदाजी करण्यासाठी मैदानावर उतरला. खरे तर, मध्य प्रदेश संघाने १७.२ षटकांत ४९ धावांवर ४ विकेट गमावल्या होत्या. अशा परिस्थितीत व्यंकटेश अय्यर सहाव्या क्रमांकावर फलंदाजीला आला आणि संघाला मोठ्या धावसंख्येपर्यंत नेण्याची जबाबदारी त्याच्या खांद्यावर आली. त्याने डावात फक्त ३ चेंडू खेळले होते, पण नंतर फलंदाजी करताना त्याचा घोटा मुरगळला. अय्यर वेदनेने ओरडत जमिनीवर पडला. दरम्यान फिजिओलाही बोलावण्यात आले. काही वेळाने इतरांच्या मदतीने, तो मैदानाबाहेर पडला. त्याला रिटायर्ड हर्ट घोषित करण्यात आले.

सामना सुरूच राहिला आणि व्यंकटेश अय्यर डगआउटमध्ये पॅड घालून आणि दुखापतग्रस्त पाय खुर्चीवर ठेवत बसलेला दिसला. केकेआरसाठी हा मोठा धक्का आहे, कारण कोलकाताने व्यंकटेश अय्यरला २३.७५ कोटी रुपयांना खरेदी केले होते.

व्यंकटेश अय्यरने आयपीएल २०२४ मध्ये केकेआरसाठी खेळताना १३ डावांमध्ये ४६.२५च्या प्रभावी सरासरीने ३७० धावा केल्या होत्या. त्याने १५८ पेक्षा जास्त स्ट्राईक रेटने फलंदाजी केली आणि हंगामात एकूण ४ अर्धशतके झळकावली.

व्यंकटेश अय्यरच्या आयपीएल कारकिर्दीबद्दल बोलायचे झाल्यास, त्याने आतापर्यंत ५० सामने खेळले आहेत. त्यामध्ये त्याने ३१.५७च्या सरासरीने फलंदाजी करताना १,३२६ धावा केल्या आहेत. दरम्यान त्याचा स्ट्राईक रेट १३७.१३ राहिला आहे. आयपीएलमध्ये त्याने ११ अर्धशतकांसह १ शतक झळकावले आहे. तर आयपीएलमधील त्याची सर्वोच्च धावसंख्या १०४ आहे.

---

# कोरगावात डोंगर माळरानावर कुंपणासाठी दिलेला ना हरकत दाखला घेतला मागे

■ टीम दैनिक हेराल्ड

**पेडणे, दि. २३ :** कोरगाव पंचायत क्षेत्रातील डोंगर माळरानावर २३९/० या सर्वे मधील लाखो चौरस मीटर जमीन ही बिगर गोमंतकीयांनी विकत घेतली आणि या ठिकाणी मोठ्या प्रमाणात दगडी कुंपण घालण्यात आले होते. त्यामध्ये पारंपरिक पाण्याचे स्त्रोत, नाले होते. तेही नाले बुजवण्याचा प्रयत्न बांधकाम व्यावसायिकांनी केला होता. त्या संदर्भात कोरगाव येथील जागृत युवक राहुल भगत यांनी सरकार दरबारी विविध खात्याला या विरोधात तक्रार दिली होती. त्या तक्रारीची दखल घेत टीसीपी विभागाने ना हरकत दाखला मागे घेण्यास सूचना कोरगाव पंचायतीला केली. त्यानंतर लगेच कोरगाव पंचायतीचे सरपंच अब्दुल करीम नाईक यांच्या अध्यक्षतेखाली तातडीची पंचायत मंडळाची बैठक होऊन या बैठकीत ठराव घेऊन दिलेला परवाना मागे घेण्याचा ठराव मंजूर केला.

कोरगाव सरपंच अब्दुल करीम नाईक यांनी सांगितले की, आपण पंचायत क्षेत्रात कसल्याच प्रकारच्या बेकायदेशीर बांधकाम व्यावसायिकांना प्राधान्य देत नाही. सदर दगडी कुंपणासाठी स्थानिक नागरिकाने तक्रार केली होती. पंचायतीनेही कागदपत्रे संबंधितांनी व्यवस्थित दिल्यानंतर त्यांना ना हरकत दाखला दिला होता. परंतु, टीसीपी विभागाने दिलेला परवाना रद्द केल्यामुळे कोरगाव पंचायतीनेही ठराव घेऊन हा परवाना रद्द केला. . संबंधित दगडी कुंपण बांधण्यासाठी परवाना आपण दिलेला नाही. कारण आपण त्याकाळी सरपंच नव्हतो. जर टीसीपी ने दिलेला परवाना मागे घेतला तर आपण आणि पंचायतही तो दिलेला परवाना मागे घेणार आणि त्याप्रमाणे आमची पंचायत मंडळ कार्यरत होऊन तो दिलेला परवाना मागे घेतला, असे त्यांनी सांगितले .

---

# छायाचित्रण स्पर्धेत शैलेंद्र नाईक प्रथम

■ टीम दैनिक हेराल्ड



मडगाव, दि.२३ : गोवा सरकारच्या वनखात्याने आयोजित केलेल्या आठव्या अखिल गोवा पक्षी छायाचित्रण स्पर्धेत शैलेंद्र नाईक यांच्या पक्षी छायाचित्राला या २०२५ सालचा प्रथम पुरस्कार प्राप्त झाला आहे. वन खात्याचे प्रमुख वनपाल धनंजय मोहन आय एफ एस गोवा वनखाते यांच्या हस्ते पुरस्कार स्वीकारला. शैलेंद्र नाईक यांना या वार्षिक स्पर्धेत तिसऱ्यांदा प्रथम पुरस्कार प्राप्त झालेला आहे. त्यांना यापूर्वी दोनदा द्वितीय पुरस्कार व एकदा उत्तेजनार्थ पुरस्कार प्राप्त झाला होता.... ...

---

# कौशल्य समृद्धीतून विद्यार्थ्यांना रोजगाराची संधी

## संचालक भूषण सावईकर : स्कील टू करियर कार्यक्रमाचा आंबिये महाविद्यालयात शुभारंभ

■ टीम दैनिक हेराल्ड

**पेडणे, दि. २३ :** विद्यार्थ्यांनी स्किल टू करियर या प्रशिक्षण कार्यक्रमातून मिळणाऱ्या कौशल्यांचा नियमितपणे सराव करावा, त्यामुळे प्राप्त कौशल्ये अधिक समृद्ध होऊन विद्यार्थ्यांना रोजगाराची संधी तात्काळ उपलब्ध होऊ शकते, असे प्रतिपादन उच्च शिक्षण संचालनालयाचे संचालक भूषण सावईकर यांनी केले.

गणपत विद्यापीठ गुजरात आणि संत सोहिरोबानाथ आंबिये कला आणि वाणिज्य शासकीय महाविद्यालय विर्नोडा येथील वाणिज्य विभाग यांच्या संयुक्त विद्यमानाने दि.२२ ते ३१ जानेवारी या दरम्यान आयोजित केलेल्या स्कील टू करियर या कॉर्पोरेट स्किलिंग कार्यक्रमाच्या उद्घाटन सत्रात संचालक भूषण सावईकर बोलत होते.




**विर्नोडा : स्कील टू करियरच्या शुभारंभाप्रसंगी उच्च शिक्षण संचालनालयाचे संचालक भूषण सावईकर व महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. प्रवीणा केरकर व मान्यवर तज्ज्ञ.**

यावेळी गणपत विद्यापीठ गुजरातचे अध्यक्ष डॉ.गणपतभाई पटेल, गणपत विद्यापीठाचे कुलगुरू प्रो.महेंद्र शर्मा, (ऑनलाईन) महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. प्रवीणा केरकर, गणपत विद्यापीठाचे उपकुलगुरू डॉ. सौरभ दवे, प्रशिक्षण कार्यक्रमाचे समन्वयक प्रो. डॉ. आर.डी.पाटील, नेहल देसाई, प्रो. चेतन गुप्ते, प्रो. प्रकाश, प्रा.देवानंद वेलिंगकर आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या संयोजनात रुद्रेश सावंत, आर मलिक आणि वाणिज्य विभागातील कर्मचाऱ्यांनी सहभाग दर्शविला.

विद्यार्थ्यांना कार्पोरेट क्षेत्राशी संबंधित कौशल्यांचे प्रशिक्षण देऊन उद्योगधंद्यांची गरज लक्ष्यात घेऊन त्यांना उद्योगधंदे व कंपन्यांमध्ये रोजगाराची संधी उपलब्ध करून देण्यासाठी स्किल टू करियर या कार्यक्रमाचे आयोजन आंबिये शासकीय महाविद्यालयात करण्यात आलेले आहे.

**उत्तर गोव्यातील १५० विद्यार्थ्यांना प्रशिक्षण**

स्किल टू करिअर या कार्यक्रमात उत्तर गोव्यातील दहा महाविद्यालये, आयटीआय आणि एचएससी अशा विविध स्तरातील १५० विद्यार्थ्यांना प्रशिक्षण दिले जाणार आहे. आयबीएम, एसएएस इंडिया यांच्याद्वारे प्रमाणपत्र कार्यक्रम व नॅशनल ॲडिक्टिव्ह मॅन्युफॅक्चरिंग प्रमाणपत्र कार्यक्रम (थ्रीडी प्रिंटिंग) या प्रशिक्षण कार्यक्रमांचा समावेश आहे.

> **या प्रशिक्षण सत्रातून मानवी संसाधनाच्या वाढत्या जागतिक मागणीची पूर्तता होऊन स्मार्ट उद्योजक तयार होतील. त्यामुळे २०४७ चा विकसित भारत या संकल्पनेच्या अधिक जवळ जाता येईल.**
> **–डॉ.गणपतभाई पटेल,** अध्यक्ष, गणपत विद्यापीठ.

> **या प्रशिक्षण कार्यक्रमातून उद्योग आणि शिक्षण यांच्यातील अंतर कमी होऊन विद्यार्थ्यांना रोजगाराच्या संधी अधिक उपलब्ध होतील.**
> **–प्रो.महेंद्र शर्मा,** कुलगुरू, गणपत विद्यापीठ.

### समृद्ध पेडणे अभियानासाठी महाविद्यालय कटिबद्ध : प्रा.केरकर

**समृद्ध पेडणे अभियानासाठी आंबिये महाविद्यालय कटिबद्ध असून महाविद्यालयातील मानवी संसाधनांचा, तंत्रज्ञानाचा, जागेचा आणि वेळेचा अधिक चागला उपयोग केला जाईल, असे उद्गार महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. प्रवीणा केरकर यांनी काढले.**

RNI No. GOAMAR/2013/49899 **दैनिक हेराल्ड** वर्ष १३, अंक १४२ **मालक:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., **प्रिंटर:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशक:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशन स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल – १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा, **छपाई स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल – १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा. **एडिटर इन चीफ:** श्री. आर. एफ. फर्नांडिस, **संपादक:** श्री. दिनेश वासुदेव केळुस्कर (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी).

RNI No. GOAMAR/2013/49899 **Dainik Herald** Volume 13, Issue 142 **Owner:** Herald Publications Pvt. Ltd., **Printer:** Mr. Walter Ligorio D'Sousa, **Publisher:** Mr. Walter Ligorio D'Sousa,, **Published from:** Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa and **Printed from**: Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa. **Editor in Chief** Mr. R. F. Fernandes, **Editor :** Mr. Dinesh Vasudev Keluskar (Responsible under P.R.B. Act), .